बजरंग सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), नांदुरा, जि. बुलढाणा या संस्थेचे अतिरीक्त क्षेत्र गहाणमुक्त करुन इतरांना हस्तांतरीत/विक्री करण्यास परवानगी देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**शासन निर्णय क्र.घबांक ३२२६/प्र.क्र.३१९ /१९-स,**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ११ जुन २०२६

<u>संदर्भ</u> -: १) शासन निर्णय क्र. एचएसजी/३२०७/प्र.क्र.३५९/पहिला/१८-स,दिनांक ११/१२/२००७.

२) शासन निर्णय क्र. एचएसजी/३२०७/प्र.क्र.३५९/दुसरा/१८-स,दिनांक २०/०३/२००९

३) शासन निर्णय क्र. एचएसजी/३२०७/प्र.क्र.३५९/दुसरा(२)/१८-स,दिनांक २९/०९/२००९

४) शासन निर्णय क्र. एचएसजी/३२०७/प्र.क्र.३५९/दुसरा (३) व तिसरा/१८-स, दिनांक २९/०३/२०१०

५) शासन निर्णय क्र. एचएसजी/३२०७/प्र.क्र.३५९/ तिसरा/१८-स,दिनांक ३१/०३/२०११

६) संस्थेचा दिनांक १७/०३/२०२६ रोजीचा प्रस्ताव.

७) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदुरा ता. नांदुरा जि. बुलढाणा यांचे पत्र जा.क्र.सनिना/बजरंग सह गृह निर्माण/स्थळ पाहणी/२६२/२०२६, दि. १०/०४/२०२६.

**<u>प्रस्तावना -:</u>**

बजरंग सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), नांदुरा, जि. बुलढाणा या गृहनिर्माण संस्थेच्या ३१ सभासदांकरीता शासनाच्या गट विमा योजनेअंतर्गत घरबांधणीकरीता कर्ज मंजूर करण्यात आले होते. बजरंग सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), नांदुरा, जि. बुलढाणा या संस्थेच्या ३१ सभासदांकडे शासनाच्या गट विमा योजनेअंतर्गत घर बांधणीकरीता पहिला हप्ता मंजूर झाल्यानंतर संस्थेने नांदुरा, जि. बुलढाणा येथे सर्व्हे नंबर ३० मधील एकूण क्षेत्र ३९५४.५० चौरस मीटर क्षेत्राचे २४ भूखंड त्यावरील बांधकामासह शासनाकडे दस्त क्र. नदर १६२/१-५६/२००८ दि. २४/०१/२००८ अन्वये तारण ठेवण्यात आले आहे.

सदर संस्थेच्या ३१ पात्र सभासदांना शासनाकडून संस्थेमार्फत कर्ज मंजूर करण्यात आले आहे. तसेच संस्थेने इतर ४ अशासकीय सदस्यांना समावून घेतले आहे. संस्थेने सामावून घेतलेल्या सदर ४ अशासकीय सदस्यांना शासकीय कर्ज प्राप्त झाले नाही. तथापि, संस्थेने संपुर्ण क्षेत्राचे (३९५४.५० चौमी) गहाणखत केलेले असल्याने, इतर ४ अशासकीय सदस्यांचे प्लॉट सुद्धा गहाणखतात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यामुळे शासकीय कर्ज न मिळालेल्या परंतू गहाणखतात सामाविष्ट असलेल्या सर्व्हे नंबर ३०/२ मधील प्लॉट क्र. ७,१५, १६,१७ व सर्व्हे नंबर ३०/३ व ३०/४ मधील प्लॉट नंबर २८, २९ व ४० ह्या प्लॉटचे एकुण ११७० चौमी क्षेत्र गहाणखतातून वगळण्याबाबत संस्थेने दिनांक १७/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुषंगाने संस्थेच्या सदर प्रस्तावास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -:**

बजरंग सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), नांदुरा, जि. बुलढाणा या गृहनिर्माण संस्थेच्या मालकीच्या शासनाकडे गहाण असलेल्या एकुण ३९५४.५० चौमी भूखंडापैकी सर्व्हे नंबर ३०/२ मधील प्लॉट क्र. ७,१५,

१६,१७ व सर्व्हे नंबर ३०/३ व ३०/४ मधील प्लॉट नंबर २८, २९ व ४० यावरील एकूण ११७०.०० चौरस मीटर इतके क्षेत्र, भविष्यात गटविमा योजनेंतर्गत सदर संस्थेस शासनाकडून घरबांधणी कर्ज मंजूर केले जाणार नाही, या अटीच्या अधिन राहून गहाणखतातून वगळण्यात येत आहे. तसेच सदर बांधकाम विरहीत क्षेत्र इतरांना हस्तांतरीत/विक्री करण्यास याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०६१११०५५४०१३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI

Digitally signed by VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=f8392d872b7180812a91876993d519e95c3e41444d8d93ecaac6a9b51c69838f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C0422C17B24964BFB1F10270074369C4888C02315C6A4C050EAA332B556F90EA, cn=VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
Date: 2026.06.11 10:56:33 +05'30'

**(विजया संगशेट्टी)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई-०१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती)
२) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य नागपूर-०२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती)
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे.
६) संचालक, विमा संचालनालय, मुंबई गृहनिर्माण भवन (म्हाडा) खोली क्र. २६४, पहिला मजला, बांद्रे (पुर्व) ४०० ०५१.
७) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती
८) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जि. बुलढाणा.
९) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा, जि. बुलढाणा.
१०) जिल्हा विशेष, लेखापरिक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था, बुलढाणा, जि. बुलढाणा.
११) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदुरा ता. नांदुरा, जि. बुलढाणा
१२) अध्यक्ष, बजरंग सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), नांदुरा, जि. बुलढाणा
१३) निवडनस्ती